ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श परराष्ट्रीय धोरण

**डॉ. मधुकर विठोबा जाधव**
*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग*
*वाय. सी. कॉलेज, हलकर्णी*
*ता. चांदगड जि. कोल्हापूर*

छत्रपती शिवाजी महाराज हे भारत देशाच्या आदर्श परराष्ट्रीय धोरणाचे उदगाते होत. छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ राजे होत. छत्रपतींचे परकीय सत्ता संबंधीचे धोरण आजही अभ्यासनीय असेच आहे. छत्रपतींचे शासन, प्रशासन-न्याय व कार्य जगातील लोकशाही शासनव्यवस्थेचा पाया आहे. त्यांनी स्वराज्याची शासनव्यवस्था पाहण्यासाठी सहा खात्याची निर्मिती केली. त्यामध्ये परराष्ट्रखाते महत्त्वाचे होते.परकीय राष्ट्राबरोबरचे सर्व व्यवहार सांभाळण्याचे कार्य या खात्याकडे असे. वेगवेगळ्या आदिलशाही, मोगल, निजामशाही, यांच्याकडे पत्रव्यवहार या खात्या मार्फत केला जात असे. त्याच बरोबर युरोपीय देश इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच यांनाही पत्रव्यवहार या खात्याकडून होत असे. तह, करार, कौलनामे, आदी. बाबत पत्रव्यवहार केला जात असे. स्वराज्यातील वकिलांकडून केली जाणारी बोलनी यांचाही समावेश या परराष्ट्र व्यवहारांमध्ये होत असे. या पत्रव्यवहार बरोबरच छत्रपतींचे परकीय देशांशी कसे संबंध निर्माण झालेले होते याचा आढावा परराष्ट्रीय धोरणातून घेता येईल.

स्वराज्याच्या वाढीसाठी छत्रपतींनी आपले परराष्ट्रीय धोरण योग्य प्रकारे राबविले. परकीयांच्या साम्राज्याला आवर घालने हे छत्रपतींच्या परराष्ट्रीय धोरणाचे वैशिष्ट्य होते.[१] हिंदुस्थानामध्ये प्रवेश करणारा पहिला युरोपियन पोर्तुगीज खलाशी म्हणजे वास्को-द-गामा होय. इ.सन.१९९८ मध्ये तो हिंदुस्तानच्या कालिकत बंदरात येऊन उतरला.[२] छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य स्थापन करण्या अगोदर शहाजीराजे आणि पोर्तुगीज यांचे संबंध मैत्रीपूर्ण होते. शहाजीराजे आदिलशहाच्या दरबारात असताना त्यांचे परकीयांबरोबर संबंध निर्माण झाले. इ. सन. १६४८ पासून खऱ्या अर्थाने मराठे व पोर्तुगीज यांच्यामध्ये कुडाळ संबंधावरून सहसंबंध निर्माण झाले.[३] छत्रपतींचे थेट संबंध राजापूर, सुरत पहिली व दुसरी लूट या माध्यमातून निर्माण झाले. परकीयांशी संबंध जोडताना छत्रपतींनी नैतिक दबावाचा मोठ्या प्रमाणात वापर केला. दबावाचा वापर हेच छत्रपतींच्या युद्धनीतीचे व परराष्ट्रीय धोरणाचे महत्वाची तंत्र होते, युद्धशास्त्रानुसार या विशाल तत्वांचा अवलंब करणारे छत्रपती शिवाजी महाराज जगाच्या इतिहासातील सर्वोच्च राजे होते.[६]

इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्तुगीज, आदी. बरोबर फर्माने, फत्तवे, कौलनामे करून त्यांना छत्रपतींनी लांबच ठेवले. समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणाचा मुकाबला करून मोगल व आदिलशहा यांना युरोपीय सत्ता आरमाराची मदत करतील, गलबताचा वापर करतील हे जाणून छत्रपतींनी शत्रु पक्षाच्या अगोदर सुसज्ज असे नौदल निर्माण केले व सागरावर्ती स्वतःची सत्ता निर्माण केली.५ परकीय व्यापारी इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच यांच्यावर दहशत बसविण्यासाठी छत्रपतींनी सुरत, हुबळी, राजापूर, अथणी, जुन्नर, धरणगाव आदि. ठिकाणी लूट केली. छत्रपतींचा हेतू असा होता की त्यांनी लपविलेल्या पैसा काढून त्याचा उपयोग स्वराज्यासाठी केला जावा.[६] छत्रपतींनी सिंधुदुर्ग बंदरात मोठ्या गलबांचे आरमार उभा केले. छत्रपती दिनांक ०८.०२.१६६५ रोजी मालवणातून ८५ लढाऊ गलबते व तीन मोठ्या महागिऱ्या घेऊन बेद्रुरच्या राज्यातील प्रसिद्ध बंदर बसरूर येथे दाखल झाले. एकाच दिवसात मोठी लुट प्राप्त करून छत्रपती स्वराज्यात परतले.[७]

छत्रपती शिवाजी महाराजांना स्थानिक प्रजेला परकियांच्या जोखडातून बाहेर काढणे आवश्यक वाटत होते. व धार्मिक बाबतीतील जुलूम जबरदस्ती थांबविण्यासाठी व सामान्यांच्या हितासाठी छत्रपतींनी त्यांच्याबरोबर संघर्षाचा पवित्रा घेतला.[८] छत्रपती व पोर्तुगिज यांच्यामध्ये ११.१२.१६६७ मध्ये तह झाला. गोसलूमार्तीस हा पोर्तुगिज किल्ले रायगडावर आला व उभयत्यांमध्ये तह झाला. त्यामध्ये पोर्तुगीजांनी छत्रपतींच्या शत्रुसैन्याला मदत करू नये. पोर्तुगीजांनी धर्मांत्तराला पाठींबा देऊ नये. मालाच्या खरेदी-विक्री

संदर्भात बोलणीझाली. या तहाद्वारे छत्रपतींनी पोर्तुगिजांना पायदंड घातला.[९] इ.सन. १६६७ साली छत्रपतींनी गोवाजवळील बारदेश या प्रांतावर हल्ला केला. या स्वरीमध्ये छत्रपतींनी पोर्तुगिजांना साळोकी पळो करून सोडले.[१०] गोवा जिंकून घेतला पाहिजे व पोर्तुगिज सत्तेला हदरा दिला पाहिजे असे छत्रपती शिवाजी महाराजांना वाटत होते म्हणून छत्रपतींनी इ. सन. १६६८ साली गोव्याचे पोर्तुगीजांचे राज्य संपूर्ण जिंकून ते स्वराज्याला जोडायची योजना तयार केली होती. यातून छत्रपती व पोर्तुगिज यांच्यामध्ये तह झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी रामनगरचे राज्य जिंकल्यानंतर पोर्तुगिजांकडे चौथाईची मागणी केली.[११] इ. सन. १६७२साली पोर्तुगीजांच्या ताब्यातील घोडेबंदर हा किल्ला मराठ्यांनी घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात यश आले नाही. इ. सन. १६७४ साली जव्हार, रामनगर हि ठाणी मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली जिंकून घेतली. गुप्त पद्धतीने गोव्यातील पोर्तुगीजांवर हल्ला करून त्यांचा पराभव करण्याचा कट छत्रपतींनी रचला होता.सक्तीच्या धर्मांतरामुळे छत्रपती पोर्तुगीजांविरुद्ध संतप्त झाले. इ. सन. १६७५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी फोंडा किल्ला तटबंदीला सुरुंग लावून पाडला व जिंकला.[१२] किल्ला जिंकून घेतल्यावर छत्रपतींनी पडझड झालेल्या फोंडा किल्ल्याची दुरुस्ती तत्काळ करून घेतली. छत्रपतींनी हा किल्ला पहिल्या पेक्षाही मजबूत बनविला.[१३] २८.०१.१६८० च्या पोर्तुगिज पत्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या योग्यतेची व पराक्रमाची माहिती आली आहे.[१४]

महाराष्ट्रातील राजापूर ही पूर्वेकडील फार मोठी बाजारपेठ होती. आशिया, आफ्रिका, इजिप्त, युरोप या ठिकाणाहून आलेल्या मालाची खरेदी-विक्री राजापूरमध्ये होत होती. इ. सन. १६६१ ला छत्रपती शिवाजी महाराजांनी ४००० सैन्य राजापूरवर पाठवून तेथील इंग्रज वखार पूर्णपणे लुटली. त्या लुटीत २४००० होन एवढा ऐवज मिळाला. जमीन खणून या वखारीतील संपत्ती मिळविली. आणि तेथील व्यापाऱ्यांना अटक केली. परकीय व्यापारी देशांवर छत्रपतींनी एक प्रकारे दबाव निर्माण केला.[१५] इ.सन.१६६४ च्या पहिल्या सुरत लुटीच्या वेळी छत्रपती व इंग्रज यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला.[१६] १९ सप्टेंबर १६६९ रोजी मराठे व इंग्रज यांच्यामध्ये सागरी समुद्रावर पहिली चकमक झाली. या लढाईमध्ये छत्रपतींच्या आरमाराने इंग्रजांना पराभूत केला व सागरी किनारपट्टीवर आपला दबाव निर्माण केला.[१७] छत्रपतींनी कारवार जिंकून घेतल्यानंतर तेथील इंग्रज वाखारीतील रॉबर्ट जेन्स व एडवर्ड ऑस्टिन हे दोघे इंग्रज छत्रपतींना भेटायला गेले. राजापूर वखारी बरोबर करार झाला.[१८] इ.सन. १६७०च्या दुसऱ्या लुटीमध्ये मराठे व इंग्रज यांच्यामध्ये चकमक झाली. परंतु इंग्रजांनी दोन वकील व काही भेटवस्तू देऊन छत्रपतींकडे पाठविले. इंग्रज सांगतात छत्रपतींनी वकिलांना मोठ्या प्रेमाने वागविले. इंग्रजांनी नेहमीच स्वत:च्या स्वार्थासाठी राजकारण केलेले दिसते. राजापूरची वखार लुटल्या नंतर इ.सन. १६७२ च्या सुरुवातीला इंग्रजांनी आपला वकील युस्टीक यास छत्रपतींच्या भेटीसाठी पाठविले.[१९]

हुबळी स्वारीच्या वेळी इ.सन. १६७३मध्ये मार्च महिन्यात इंग्रजांनी तक्रार केली की, मराठयांनी इंग्रजांची वखार लुटली. तेव्हा छत्रपतींनी उत्तर दिले की हे कृत्य आमच्या माणसांच्या हातून झाले नाही.[२०] इ.सन. १६७३ मध्ये छत्रपतींच्या भेटीसाठी इंग्रज वकील थॉमस निकोलस किल्ले रायगडावर आला होता. परंतु त्यापासून काहीही फलनिष्पत्ती झाली नाही.[२१] दि.२०.०५.१६७३ रोजी थॉमस निकोलस किल्ले रायगडावर पोहोचला. दि.२ जून १६७३ रोजी छत्रपती किल्ले रायगडावर आले व ३ जून रोजी मुलाखत होऊन निकोलस व महाराज यांची चर्चा झाली. हुबळीच्या लुटी संदर्भात चर्चा झाली छत्रपतींनी त्याची कोणतीही तक्रार ऐकून घेतली नाही. भिमाजी पंडिताकडे उत्तर पाठविले जाईल असे सांगून त्याला छत्रपतींनी पानसुपारी व वस्त्रे देऊन निरोप दिला.[२२]

दि. २२.०५.१६७४ ला दुसरा इंग्रज ऑक्झिंडेन महाराजांच्या भेटीसाठी किल्ले रायगडावर आला. चार दिवसांनी त्याने छत्रपतींची भेट घेतली. २६ मे ला छत्रपती व ऑक्झिंडेन यांच्यामध्ये मुलाखत झाली.[२३] छत्रपतींच्या राज्याभिषेकाला तो हजर होता. थॉमसमिचेल आणि जॉर्ज रॉबिन्स हे दोघे त्याच्या सोबतीला होते.[२४] राज्याभिषेकानंतर ११ जूनला तहातील कलमाविषयी चर्चा झाली. दि. १२.०६.१६७४ रोजी छत्रपती व ऑक्झिंडेन यांच्यामध्ये तह झाला व प्रधानांनी तहावर सह्या केल्या.[२५] दोघांमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण होतील असे या तहातून स्पष्ट झाले. छत्रपतींनी इंग्रजांकडे तोफा व दारुगोळा याची मागणी केली. दि. १३ जूनला ऑक्झिंडेन किल्ले रायगडहून निघाला व १६ जूनला तो मुंबईला पोहोचला.[२६]

इ.सन. १६७९-८० मध्ये छत्रपती व इंग्रज यांच्यामध्ये आरमारी संघर्ष झाला. दि. १८.०९.१६७९ रोजी इंग्रज जहाजांनी खांदेरीवर हल्ला केला तो हल्ला मराठा लष्कराने मोडून काढला. चार इंग्रज अधिकारी ठार झाले व अनेक कैदी बनले. मराठयांनी इंग्रजांचा पूर्णपणे पराभव केला. ऑक्टोबर मध्ये पुन्हा इंग्रजांनी खांदेरीवर हल्ला केला. छत्रपतींनी दौलखान याला इंग्रजांचा पराभव करण्यासाठी पाठविले. या संघर्षामध्ये शेवटी छत्रपतींचा विजय झाला.[२७] छत्रपती सिद्दी जोहारला मदत करण्याचा समाचार घेण्यासाठी दक्षिण कोकणात उतरले होते. तेव्हा इंग्रज अधिकारी रिचर्ड टेलर, रेडॉल्फ टेलर, गिफर्ड फेराड, हेनरी रेव्हिंग्टन, रिचर्डनेपियर, सॅम्युएल बर्नर्ड, यांना कैद करून सोनगडला ठेवण्यात आले. काही दिवसातच या कैद्यांची माफी मागितल्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले.[२८]

कोकण किनारपट्टीवर डचांची वखार वेंगुर्ले या ठिकाणी होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या सैन्यानीशी इ. सन. १६६३ साली कुडाळ व सावंतवाडी जिंकली. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, धाडस, पराक्रम, कल्पकता पाहून डचही घाबरले व त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर तह केला. या तहामध्ये आप आपसातील धोरणे ठरविली. त्यामध्ये इतर युरोपियानांबरोबर लढताना एकमेकांनी मदत करावयाची असे ठरले. महत्वाचे म्हणजे डचांनी मुंबई जिंकण्यासाठी छत्रपतींना मदत करावी असे ठरले. गुलामांचा व्यापार करणार नाही असे छत्रपतींनी डचांकडून मान्य करून घेतले.[२९] इ.सन. १६६७ साली छत्रपती शिवाजी महाराजांना डचांनी बारदेशावर स्वारी करण्यासाठी उद्युक्त केले. छत्रपतींना या बदल्यात दारुगोळा पुरविला असा पोर्तुगिज डचांवर आरोप करतात कारण पोर्तुगिज व डच यांच्यामध्ये वैर होते.[३०] छत्रपती शिवाजी महाराज तमिळनाडूतील तिरुवाडी येथे असताना डचांबरोबर एक व्यापारी करार झाला.[३१] छत्रपती शिवाजी महाराजांची डच शिष्टमंडळाने इ. सन. १६७० साली भेट घेतली.[३२] छत्रपती शिवाजी महाराज व डच यांचे संबंध कसे बिघडतील हेच पोर्तुगीजांनी नेहमी पहिले. मात्र डच मराठ्यांच्या विरुद्ध कधीच गेले नाहीत. उलट बारदेश स्वारीच्या वेळी डचांनी मराठ्यांना मदत केली. त्यामुळे छत्रपतींनीही डचांना त्रास दिला नाही. डचांनी छत्रपतींसाठी इ.सन. १६७२ मध्ये किल्ले रायगडावरती किंमती नजराणा पाठविला.[३३] छत्रपतींना डच शिष्टमंडळ नेहमी भेटत राहिले. इ.सन. १६७७ साली छत्रपती दक्षिण मोहिमेवर असताना तंदुमगुर्तीस सिनॉर डेगोर व तेवेनापट्टमचा प्रमुख छत्रपतींना भेटले. एकंदरीत छत्रपती शिवाजी महाराज व डच यांचे संबंध सलोख्याचे राहिले.[३४]

छत्रपती शिवाजी महाराजांना कोकण किनारपट्टीवर सत्ता निर्माण करीत असताना ज्याच्या बरोबर कडवा संघर्ष करावा लागला तो म्हणजे सिद्दी होय. सिद्दी हे मुळचे ॲबेसिनीया देशाचे रहिवासी होते. इ. सन १६५९ साली जंजीरा घेण्यासाठी छत्रपतींनी पहिली मोहिम काढली ७००० हजार लष्कर रघुनाथ बल्लाळच्या नेतृत्वाखाली पाठविले. सिद्दीच्या ताब्यातील तळा, घोसाळा हे प्रदेश जिंकुन घेतले. रघुनाथ बल्लाळचा मृत्यु झाला तेव्हा छत्रपतीनी व्यंकोजी दत्तो यांच्या नेतृत्वाखाली जंजिरा किल्ल्याला तोफा डागल्या. परंतु यश आले नाही. सिद्दीच्या संघर्षामध्ये मराठे जमिनीवर श्रेष्ठ ठरले. मराठ्यांना जंजिरा ऐवजी दंडाराजपुरी मिळाली. मराठ्यांचे हे मोठे यश होते.[३५] इ. सन.१६६९ साली मराठे व सिद्दी यांच्यात संघर्ष सुरू झाला. छत्रपतींनी आपल्या सुसज्ज सैन्यानीशी जंजिरा किल्ल्याला वेढा दिला. कोणत्याही प्रकारची मदत सिद्दीला मिळू दिली नाही. काही दिवसात छत्रपतींनी हा वेढा उठविला. पुढे इ. सन १६७० साली पुन्हा छत्रपतींनी जंजिरा किल्ल्याला वेढा दिला व तोफांचा मारा सुरू केला. फत्तेखानने पैशाच्या मोबदल्यात जंजिरा छत्रपतींना देण्याचा विचार केला परंतु हा निर्णय एकटया फत्तेखानचा नव्हता. इ. सन १६७४ मध्ये मराठा सरदार आरमार प्रमुख दौलतखान व सिद्दीचा आरमार प्रमुख सिद्दी संबूळ या दोघांची रत्नागिरीच्या किणा-यावर खाडीमध्ये जोराची लढाई झाली. या लढाईत सिद्दी संबूळने माघार घेतली व शेवटी मराठ्यांचा विजय झाला.[३६]

इ. सन. १६७५-७६ मध्ये छत्रपतींनी सिद्दीचा जंजिरा घेण्यासाठी पुन्हा प्रयत्न केला. इ. स. १६७८ मध्ये आरमार प्रमुख दौलतखान यांच्याकडे ४००० फौज देऊन जंजिरा किल्ल्यावर हल्ला केला. परंतु वादळी वारे व खवळलेला समुद्र यामुळे स्वारी यशस्वी झाली नाही. शेवटी जंजि-याला शिड्या लावून किल्ल्यात प्रवेश करून किल्ला सर करावयाचा अशी मोहिम छत्रपतींनी निश्चित केली व त्याची जबाबदारी अलिबागचे लाय पाटील नावाच्या नायकाला देण्यात आली.[३७] पोर्तुगिज व इंग्रज यांनी नेहमी सिद्दीला मदत केली. सिद्दी व मराठे

यांच्यामध्ये अनेक वेळा संघर्ष झाला. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज व पुढेही सिद्दी मराठे संघर्ष सुरूच राहिला.[३८]

फ्रेंच हे मराठ्यांबरोबर संबंध येणारे शेवटचे परकीय होत. त्यांनी राजापूर येथे वखार स्थापन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांची परवाणगी मागितली. सर्व परकीयांबरोबर छत्रपतींनी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले होते. त्या पाठीमागचा मुख्य हेतू म्हणजे परकीयांकडून तोफा व दारूगोळा मिळविणे होय. परकीयांमध्ये फक्त फ्रेंचांनीच छत्रपतींना दारूगोळा व शस्त्रास्त्राची मदत केली.[३९] फ्रेंचांनी छत्रपती शिवाजी महाराजांना राजापूर बंदरात ८० तोफा व २०० मण शिसे विकले. इंग्रज व पोर्तुगिज यांनी छत्रपतींना मदत केली नाही परंतु फ्रेंचांनी दारूगोळयाची मदत केली.[४०] एवढेच नव्हेतर जंजिरा किल्ल्याच्या सिद्दीशी लढताना फक्त फ्रेंचांनीच छत्रपतींना मदत केली होती. हे ही लक्षात ठेवले पाहिजे. जर्मन हा फ्रेंच राजदूत इ. सन. १६७७ साली छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिरूवाडीतील युध्द छावणीत येवून भेटला.[४१] छत्रपतींच्या कर्नाटक माहिमेच्या वेळी पॉडेचेरी वखारीचा प्रमुख फ्रांस्वा मारतें यांनी छत्रपतींची भेट घेऊन छत्रपतींची परवाणगी घेतली होती. म्हणजेच मराठे व फ्रेंच यांचे मैत्रीपूर्ण संबंध राहिले.[४२]

परकीयांनीही छत्रपतींच्या प्रशासनाचे व लष्करी व्यवस्थेचे महत्व ओळखले होते. त्यामुळे ते छत्रपती बरोबर नेहमी नमते घेऊनच वागले. छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण नेहमीच परकीयांच्या साम्राज्याला आवर घालणारे राहिले. पोर्तुगिज, इंग्रज, डच हे कायमच छत्रपतींना घाबरून राहिले. छत्रपतींनी त्यांच्या वाढत्या साम्राज्याला पायबंद घालण्याचे कार्य केले. छत्रपतींबरोबर त्यांनी नेहमी जुळवूण घेण्याचे धोरण स्विकारले. या परकीय सत्तांनी नेहमी बचात्माक धोरणाचा पुरस्कार केला. काळाची पावले ओळखुन छत्रपतींनी या परकीय सत्तांना चांगलाच पायबंद घातला. सर्वच परकीय छत्रपतींना नेहमीच दचकून राहिले. छत्रपतींचा पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच यांच्याशी संघर्ष झाला. त्यांच्या राजकीय हस्तक्षेपाला नेहमीच पायबंद घातला . परंतु त्यांच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वराज्य निर्मितीसाठी उपयोग करून घेतला. प्रगतशिलतेच्या दृष्टीनेही छत्रपतींनी त्याकडे पाहिले. म्हणूनच छत्रपतींचे परराष्ट्रीय धोरण आजही भारत देशाला दिशादर्शक व आदर्शवत असे आहे.

**संदर्भ ग्रंथ -**

१. मढवी काशिनाथ, जगातील सर्वोत्तम राजा छ. शिवाजी महाराज, संस्कृती प्रकाशन, पुणे, २०१२, पृष्ठ ३६९.
२. जोशी रा. व्यं, परकीयांच्या दृष्टीतून शिवाजी, पुणे, १९९६, पृष्ठ १००.
३. कित्ता, पृष्ठ १०१.
४. मराठ्यांचे युध्दशास्त्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९८३, पृष्ठ ११ व १२.
५. कित्ता, पृष्ठ ११.
६. खोबरेकर वि. गो, भारतीय इतिहास आणि संस्कृति, मुंबई, एपिल-जून १९९२, पृष्ठ २८
७. कित्ता, पृष्ठ २९.
८. बेंद्रे वा. सी, श्री छत्रपती शिवाजी महाराज, मुंबई, १९७२, पृष्ठ ५३६.
९. शेख गफुर,मराठ्यांचा इतिहास, जळगाव, २००५, पृष्ठ १५१.
१०. पवार जयसिंगराव, शिवाजी व शिवकाल, कोल्हापूर, १९९५, पृष्ठ २२९.
११. कित्ता, पृष्ठ २२९.
१२. समेळ, पृष्ठ ४७.
१३. देवळे शं. रा, शिवराये दाविला साक्षेप, पुणे, १९७४, पृष्ठ ०९.
१४. जोशी रा. व्यं, परकीयांच्या दृष्टीतून शिवाजी, पुणे, १९९६, पृष्ठ १०८.
१५. खोबरेकर वि. गो. भारतीय इतिहास आणि संस्कृति, मुंबई, एपिल-जून १९९२ पृष्ठ २८.
१६. कित्ता, पृष्ठ २९.
१७. खोबरेकर वि. गो. भारतीय इतिहास आणि संस्कृति, मुंबई, एप्रिल-जून १९९२, पृष्ठ ३०.
१८. दिवेकर वा.द, त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९९१, पृष्ठ ३७.
१९. सरदेसाई गो. स. गर्गे म. मा [संपा], मराठी रियासत पॉप्युलर पुणे, १९९०, पृष्ठ ३८९.
२०. कुलकर्णी अ. रा व खरे ग. ह. मगठ्यांचा इतिहास, पुणे. १९८४, पृष्ठ २२५.
२१. सरदेसाई गो. स. गर्गे स. मा [संपा], मराठी रियासत, पुणे, १९९० पृष्ठ ३८९.
२२. शेजवलकर त्रेबक, श्री शिवछत्रपति संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना आराखडा व साधने, मुंबई, १९६४, पृष्ठ३७४.

२३. कित्ता, पृष्ठ ३५१.
२४. सरेन रेनू, छत्रपती शिवाजी, अंकुर प्रकाशन नोएडा [उ. प], २०१६, पृष्ठ ९७.
२५. शेजवलकर त्रेबक, श्री शिवछत्रपति संकल्पित शिवचरित्राची परतावना व साधने, मुंबई, १९६४, पृष्ट ३५९.
२६. कित्ता, पृष्ठ ३५९.
२७. केळूसकर कृ. अ, छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, २०१०, पृष्ठ ५५१.
२८. कित्ता, पृष्ठ ११२.
२९. दै. तरुण भारत, दि.१९.०२.२०२०.
३०. कुलकर्णी अ.रा व खरे ग. ह, मराठ्यांचा इतिहास, पुणे, १९८४, पृष्ठ २२२.
३१.घोरपडे आनंद, शिवछत्रपती समज- अपसमज, पुणे, २००१, पृष्ठ ४५.
३२. तापिकर श्रीकांत, शिवचरित्र, प्रतीक पुणे, २०१५, पृष्ट १०३.
३३. शेख गफुर, मराठयांचा इतिहास, जळगाव, २००५, पृष्ठ १५१.
३४. साळुंखे निरज छत्रपती शिवाजी महाराजांचे सामाज्य सातारा, २०१९, पृष्ठ ८० व ८१.
३५. साळुंखे निरज, छत्रपती शिवाजी महाराजांचे साम्राज्य, सातारा, २०१९, पृष्ठ ८४.
३६. देसाई सुभाष, छ. शिवाजी महाराज, कोल्हापूर, २०१०, पृष्ठ ५४.
३७. बाहेकर एस. ए. शिवचरित्र एक चिंतन, शिवरायांचे हेरखाते आणि सागरी सत्ता, औरंगाबाद, २००९, पृष्ट २९.
३८. देवळे शं.रा, शिवराये दाविला साक्षेप, अक्षर मुद्रणालय लोणावळा, १९७४, पृष्ठ ३०.
३९. कुलकर्णी अ.ग व खरे.ग. ह [संपा], मराठ्यांचा इतिहास, पुणे, १९८४, पृष्ट २३०.
४०. जोशी रा.व्यं. परकीयाच्या दृष्टीतून शिवाजी, पुणे, १९९६, पृष्ठ १११.
४१. शेख गफुर, मराठ्यांचा इतिहास, जळगाव, २००५, पृष्ठ १५१.
४२. बेंद्रे वा. सी, श्री छत्रपती शिवाजी महाराज, मुंबई, १९७२, पृष्ठ ५३७.